NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA-2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या २१० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## बुधवार, दि.११ फेब्रुवारी, २०२६ रोजी सकाळी ११:३० वा.

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची २१० वी बैठक **बुधवार, दि.११ फेब्रुवारी, २०२६ रोजी सकाळी ११:३० वा.** राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृह येथे मा.कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

सदर बैठकीस उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश आण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. आय. जे. तांबोळी | सदस्य | उपस्थित |
| ६) | डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर | सदस्य | उपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| ८) | प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| १०) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ११) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| १२) | श्री. महादेव धरेप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| १३) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १४) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १६) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | अनुपस्थित |
| १७) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | उपस्थित |
| १८) | डॉ. अजयकुमार जाधव, विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर<br>(मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्य | उपस्थित |
| १९) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण) तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| २०) | सीए महादेव सोमशंकर खराडे<br>वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| २१) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २२) | डॉ. अतुल लकडे, प्र. कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

प्र.कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

**श्रध्दांजली:**

महाराष्ट्राचे लोकप्रिय नेते आणि माजी उपमुख्यमंत्री कै. अजितदादा पवार यांचे दि.२८ जानेवारी, २०२६ रोजी विमान अपघातात अकाली निधन झाल्यामुळे सर्व व्यवस्थापन परिषद सदस्यांच्या वतीने त्यांना आदरांजली वहावी अशा शोकप्रस्ताव श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील यांनी मांडला. त्यास सर्व व्यवस्थापन परिषद सदस्यांनी अनुमोदन दिले व त्यांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्यात आली.

**अनुपस्थिती:**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे यांनी आपली अनुपस्थिती कळविली असल्याने त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ १ ] | दि.०७ जानेवारी, २०२६ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | दि.०७ जानेवारी, २०२६ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०९ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | विषय क्र.७ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. | |
| | पूर्वीचा ठराव | |
| | प्रस्तुत विद्यापीठ ४८२ एकर परिसरातील १० एकर परिसरामध्ये पेरणी करण्यात आलेल्या तूर शेतीमधील तूर चालू दरानुसार स्थानिक बाजारपेठेमध्ये विक्री करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | दुरुस्त केलेला ठराव | |
| | प्रस्तुत विद्यापीठ ४८२ एकर परिसरातील १० एकर परिसरामध्ये पेरणी करण्यात आलेल्या तूर शेतीमधील तूर चालू दरानुसार स्थानिक बाजारपेठेमध्ये विक्री करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>तसेच विद्यापीठाच्या शेतजमिनीमधून येथून पुढे निघणारे सर्व प्रकारचे उत्पन्न तातडीने बाजार पेठेत विकण्याची प्रक्रिया करावी, त्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेची वाट पाहून नये. तसेच येणारे उत्पन्न पुढील पिकाच्या मजुरीसाठी वापरण्यात यावे असे सर्वानुमते ठरले. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ २ ] | १) दि.२७ नोव्हेंबर, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०७ व्या तातडीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ.<br>२) दि. ०८ डिसेंबर, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०८ व्या तातडीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | १) दि.२७ नोव्हेंबर, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०७ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची सर्वानुमते नोंद घेण्यात आली.<br>२) दि. ०८ डिसेंबर, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०८ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची सर्वानुमते नोंद घेण्यात आली. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ ३ ] | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १४ (६) (ञ) नुसार, मा. कुलसचिव यांनी सादर करावयाचा विद्यापीठाच्या प्रत्येक सहा महिन्यांचा विकास कार्यक्रमांचा एक अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.<br>टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १४ (६) (ञ) नुसार, मा. कुलसचिव यांनी विद्यापीठाचा प्रत्येक सहा महिन्यांचा विकास कार्यक्रमांचा एक अहवाल व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरुन माहे दि. ०१ जुलै, २०२५ ते ३१ डिसेंबर, २०२५ या कालावधीतील मा. कुलसचिव यांनी सादर करावयाचा विद्यापीठाचा विकास कार्यक्रमांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | कुलसचिव कार्यालय |
| ठराव: | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १४ (६) (ञ) नुसार मा. कुलसचिव यांनी दि.०१ जुलै, २०२५ ते डिसेंबर, २०२५ या कालावधीतील विद्यापीठाच्या सहा महिन्यांचा विकास कार्यक्रमांचा सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ४ ] | **विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या घटनांवर प्रतिबंध घालण्यासाठीच्या मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने तीन सदस्यीय समितीने तयार केलेल्या “मानसिक आरोग्य व कल्याण धोरण” मसुदा विचारार्थ.**<br>टिपणी: मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल अनुमती याचिका क्र.३१७७/२०२५ (श्री. सुखदेव शाहा विरुध्द आंध्र प्रदेश शासन व इतर) या प्रकरणामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.२५/०७/२०२५ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये उच्च शिक्षण संस्थांसाठी महत्त्वपूर्ण मार्गदर्शक तत्वे जारी केली आहेत. सदर निर्णयामध्ये सर्व शैक्षणिक संस्थांनी स्वतंत्र “मानसिक आरोग्य व कल्याण धोरण” निश्चित करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.<br>त्याअनुषंगाने, “मानसिक आरोग्य व कल्याण धोरण” निश्चित करण्यासाठी मा.कुलगुरु महोदयांनी नामनिर्देशित केलेल्या तीन सदस्यीय समितीने सदर धोरण तयार करुन त्याचा मसुदा विद्यार्थी विकास विभागाकडे सादर केलेला आहे.<br>सबब, विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या घटनांवर प्रतिबंध घालण्यासाठीच्या मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने तीन सदस्यीय समितीने तयार केलेल्या “मानसिक आरोग्य व कल्याण धोरण” मसुदा विचारार्थ. | विद्यार्थी विकास विभाग |
| ठराव: | **विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या घटनांवर प्रतिबंध घालण्यासाठीच्या मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने तीन सदस्यीय समितीने तयार केलेल्या “मानसिक आरोग्य व कल्याण धोरण” मसुद्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ ५ ]</td><td>
प्रस्तुत विद्यापीठातील शैक्षणिक संकुलातील सर्व मूलभूत सुविधांची पाहणी / नियमित तपासणी करण्यासाठी (Campus Monitoring Committee) समिती, कार्यकक्षा, तपासणी नमूना अंतिम करण्याची बाब विचारार्थ.<br>
टिपणी: आयक्युएसी समितीची बैठक दिनांक ०२ डिसेंबर, २०२५ रोजी झालेल्या बैठकीतील आयत्या वेळेचा विषय क्र.१०.३ वरती खालील तक्यात नमूद केल्याप्रमाणे विषय क्र.१०.३ वरील ठराव करण्यात आला आहे.
<table>
<tr><td>Item No. 10.3</td><td>To constitute a committee to visit the campus school and observe cleanliness, fan and light facilities, computer availability, and all basic student amenities, and will submit its observation report in the next meeting.</td></tr>
<tr><td>Resolution</td><td>After discussion and deliberation, it was resolved that to define committee’s jurisdiction with the due approval of Hon’ble Vice Chancellor.<br>
1. Prof. Dr. Gautam Kamble - Chairman<br>
2. Dr. Vinayak Dhulap - Member<br>
3. Dr. Jyoti Mashale - Member<br>
4. Smt. Suhasini Shaha - Member<br>
5. Shri. Amit Jain - Member<br>
6. Shri. Anil Jadhav - Member Secretary</td></tr>
<tr><td colspan="2">ACTION: IQAC Section</td></tr>
</table>
उक्त तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे प्रस्तुत विद्यापीठातील सर्व शैक्षणिक संकुलात भेट देऊन तेथील स्वच्छता, पंखे व लाईट सुविधा, संगणक उपलब्धता आणि विद्यार्थ्यांसाठी असलेली सर्व मुलभूत सुविधांची पाहणी / नियमित तपासणी करण्यासाठी (Campus Monitoring Committee) समिती गठीत करण्याबाबतचा ठराव करण्यात आलेला आहे.<br>
सदर समितीच्या कार्यकक्षा, अधिकार क्षेत्र तसेच नियमावली निश्चित करण्याच्या दृष्टीने सविस्तर चर्चा करणेसाठी दि.२३/१२/२०२५ रोजी येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यानुसार सदर बैठकीत समितीची कार्यकक्षा, अधिकारक्षेत्र / नियमावली / मूल्यांकन नमूना अंतिम करण्यात आले आहे.<br>
सबब, प्रस्तुत विद्यापीठात अंमलबजावणी करण्यासाठी सदरची बाब विचारार्थ.
</td><td>आयक्युएसी विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>
प्रस्तुत विद्यापीठातील शैक्षणिक संकुलातील सर्व मूलभूत सुविधांची पाहणी / नियमित तपासणी करण्यासाठी (Campus Monitoring Committee) समिती, कार्यकक्षा, तपासणी नमूना अंतिम करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>
तसेच वरील समितीमध्ये व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. समाधान पवार यांचा समावेश करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.
</td><td></td></tr>
</table>

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ ६ ] | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन अंतर्गत अभ्यासू संशोधक, लेखक यांची ग्रंथसंपदा अध्यासनाच्या वतीने प्रकाशित करण्यासाठी तयार करण्यात आलेली नियमावली व निकष विचारार्थ.**<br>टिपणी: उपरोक्त विषयास अनुसरुन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन अंतर्गत लेखक व ग्रंथसंपदा अध्यासनाच्या वतीने प्रकाशित नियमावली तयार करण्यासाठी दि.२०/११/२०२५ रोजीच्या मान्यता टिपणीनुसार मा.कुलगुरु महोदयांनी नामनिर्देशन करुन समिती गठीत केली. सदर समितीच्या दोन बैठका घेण्यात आल्या. त्यानुसार बैठका घेऊन समितीने नियमावली तयार करुन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासनाकडे सादर केली. सदर नियमावलीस व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे.<br>सबब, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन अंतर्गत अभ्यासू संशोधक, लेखक यांची ग्रंथसंपदा अध्यासनाच्या वतीने प्रकाशित करण्यासाठी तयार करण्यात आलेली नियमावली व निकष विचारार्थ. | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन |
| ठराव: | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन अंतर्गत अभ्यासू संशोधक, लेखक यांची ग्रंथसंपदा अध्यासनाच्या वतीने प्रकाशित करण्यासाठी तयार करण्यात आलेली नियमावली व निकष यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**<br>**तसेच इतर सर्व अध्यासन व संलग्नित महाविद्यालयांना ग्रंथसंपदा प्रकाशित करावयाची असल्यास ही सदरची नियमावली व निकष लागू राहतील असे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ७ ] | **श्री संत शिरोमणी नामदेव महाराज चॅरिटेबल ट्रस्ट संचलित "पिंक रेव्होल्युशन", अकलूज या स्वयंसेवी संस्थेसोबत गर्भाशय मुख कर्करोग जनजागृती व प्रतिबंधात्मक लसीकरण प्रोत्साहनासाठी सामंजस्य करार करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठास श्री संत शिरोमणी नामदेव महाराज चॅरिटेबल ट्रस्ट संचलित "पिंक रेव्होल्युशन", अकलूज या स्वयंसेवी संस्थेमध्ये गर्भाशय मुख कर्करोग (Cervical Cancer) प्रतिबंध, जनजागृती व प्रतिबंधात्मक लसीकरण (HPV Vaccination) प्रोत्साहन या विषयावर सहकार्य करण्यासाठी सामंजस्य करार (MoU) करण्याचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे.<br>पिंक रेव्होल्युशन ही संस्था गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्रात महिलांमध्ये व किशोरवयीन मुलींमध्ये गर्भालय मुख कर्करोगाविषयी जनजार्गती, आरोग्य शिक्षण तसेच एच.पी.व्ही. लसीकरणाच्या प्रचार-प्रसाराचे कार्य करीत आहे. सदर सहकार्यामुळे विद्यापीठाच्या सामाजिक दायित्व, सार्वजनिक आरोग्य, महिला आरोग्य संवर्धन व समुदाय सहभाग या उद्दिष्टांना बळकटी मिळणार आहे.<br>प्रस्तावित सामंजस्य करारांतर्गत जनजागृती कार्यक्रम, कार्यशाळा, आरोग्य शिबिरे, प्रशिक्षण उपक्रम, माहिती-शिक्षण-संवाद (IEC) साहित्य निर्मिती तसेच संशोधन व विस्तार उपक्रम राबविण्यात येतील. सदर MoU हा अव्यावसायिक (Non-commercial) स्वरुपाचा असून कोणतीही आर्थिक देयता विद्यापीठावर येणार नाही.<br>सबब, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ व पिंक रेव्होल्युशन, अकलूज यांच्यात गर्भाशय मुख कर्करोग जनजागृती व प्रतिबंधात्मक लसीकरण प्रोत्साहनासाठी सामंजस्य करार करण्याची बाब विचारार्थ. | आरोग्य केंद्र |
| ठराव: | **श्री संत शिरोमणी नामदेव महाराज चॅरिटेबल ट्रस्ट संचलित "पिंक रेव्होल्युशन", अकलूज या स्वयंसेवी संस्थेसोबत गर्भाशय मुख कर्करोग जनजागृती व प्रतिबंधात्मक लसीकरण प्रोत्साहनासाठी सामंजस्य करार करण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ८ ] | **प्रस्तुत विद्यापीठाच्या संकुलातील नियमित पदावर कार्यरत असलेल्या चार पात्र अध्यापकांना कॅस अंतर्गत पदोन्नती देण्याकरिता शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ मधील तरतूदीनुसार गठित करण्यात येणाऱ्या निवड समिती मधील तरतूद क्र. vii नुसार व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाच्या व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेले एक प्राचार्य यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाच्या संकुलांतील नियमित पदावर कार्यरत डॉ. विकास बाबुराव पाटील, प्राध्यापक यांचे प्राध्यापक पदावरुन वरिष्ठ प्राध्यापक या पदावर, डॉ. सौ. अंजना संजय लावंड, सहयोगी प्राध्यापक यांचे सहयोगी प्राध्यापक पदावरुन प्राध्यापक या पदावर, डॉ. विकास दादाभाऊ कडू व डॉ. श्रीराम दगडू राऊत यांना सहायक प्राध्यापक (निवड श्रेणी) पदावरुन सहयोगी प्राध्यापक या पदावर कॅस अंतर्गत पदोन्नती देण्याकरिता प्राप्त प्रस्तावाची मा. कुलगुरु महोदयांनी गठित केलेल्या छाननी समितीकडून छाननी व पडताळणी होऊन छाननी समितीचा अहवाल आस्थापना विभागास प्राप्त झाला असून, सदर अहवालानुसार उक्त चार अध्यापक पदोन्नतीसाठी पात्र आहेत.<br>सदर कॅस अंतर्गत पदोन्नतीच्या पुढील प्रक्रियेसाठी शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ मधील तरतूदीनुसार निवड समिती गठित करावी लागणार आहे. त्याकरिता निवड समितीमधील तरतूद क्र. vii नुसार व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाच्या व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेले एक प्राचार्य यांचे नामनिर्देशन करण्याची तरतूद आहे.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठाच्या संकुलातील नियमित पदावर कार्यरत असलेल्या चार पात्र अध्यापकांना कॅस अंतर्गत पदोन्नती देण्याकरिता शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ मधील तरतूदीनुसार गठित करण्यात येणाऱ्या निवड समिती मधील तरतूद क्र. vii नुसार व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाच्या व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेले एक प्राचार्य यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठाच्या संकुलातील नियमित पदावर कार्यरत असलेल्या चार पात्र अध्यापकांना कॅस अंतर्गत पदोन्नती देण्याकरिता शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ मधील तरतूदीनुसार गठित करण्यात येणाऱ्या निवड समिती मधील तरतूद क्र. vii नुसार प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड यांचे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ९ ] | दिनांक २७/११/२०२५ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेने ठराव क्र. ४ अन्वये मान्यता प्रदान केल्यानुसार, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ शैक्षणिक उत्कृष्टता (ॲकॅडमिक एक्सलन्स) पुरस्कार व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ तरुण शास्त्रज्ञ (यंग सायंटिस्ट) पुरस्काराची नियमावली व इतर अनुषंगिक बाबी ठरविण्याबाबतच्या गठित समितीने दिनांक १७/०१/२०२६ रोजी दोन्ही पुरस्कारांच्या नियमावली व इतर अनुषंगिक बाबी तयार करुन सादर केल्या असून, सदरील बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.<br>टिपणी: दिनांक २७/११/२०२५ रोजीच्या बैठकीत व्यवस्थापन परिषदेने ठराव क्र. ४ अन्वये दिनांक ०३/१०/२०२५ रोजीच्या अधिसभेने ठराव क्र. ११ अन्वये केलेली शिफारस खालीलप्रमाणे दुरुस्तीसह स्विकारुन सर्वानुमते मान्यता प्रदान केली होती.<br>१) विद्यापीठ संकुले व संलग्नित महाविद्यालयांमधील शिक्षकांनी दरवर्षी अधिकाधिक संशोधनात्मक कार्य करावे आणि ते संशोधन शैक्षणिक नियतकालिंकामध्ये प्रकाशित करावे, यासाठी प्रेरणा मिळावी या उद्देशाने अशा गुणावत्तापूर्ण संशोधन करणाऱ्या नियमित व कंत्राटी शिक्षकांना दरवर्षी ५ सप्टेंबर (शिक्षक दिन) या दिवशी खालील प्रमाणे दोन पुरस्कार प्रदान करण्यात यावेत.<br>i) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ ॲकॅडमिक एक्सलन्स पुरस्कार व<br>ii) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यंग सायंटिस्ट पुरस्कार (४० वर्षाखालील शिक्षकांसाठी)<br>२) सदर पुरस्काराचे स्वरुप रोख रक्कम रुपये १० हजार व प्रमाणपत्र असे राहील.<br>३) सदर पुरस्काराची नियमावली व इतर अनुषंगिक बाबी ठरविण्यासाठी समिती गठीत करण्यात आलेली होती.<br>सदर दोन पुरस्कारांची नियमावली व इतर अनुषंगिक बाबी ठरविण्यासाठी गठित समितीची बैठक दिनांक १७/०१/२०२६ रोजी विद्यापीठ कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. समितीने सर्वकष अभ्यास करुन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ शैक्षणिक उत्कृष्टता (ॲकॅडमिक एक्सलन्स) पुरस्कार व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ तरुण शास्त्रज्ञ (यंग सायंटिस्ट) पुरस्कार (४० वर्षाखालील शिक्षकांसाठी) या दोन्ही पुरस्कारांची नियमावली व इतर अनुषंगिक बाबी तयार करुन आस्थापना विभागास सादर केल्या आहेत.<br>सदर पुरस्काराचे स्वरुप रोख रक्कम रु.१०,०००/- व प्रमाणपत्र असे असल्याने आर्थिक वर्ष २०२६-२७ पासून या दोन्ही पुरस्काराकरिता व अनुषंगिक प्रशासकीय कार्यवाहीच्या खर्चासाठी रु.५०,०००/- ची तरतूद नव्याने करण्याची बाब, समितीने तयार करुन दिलेल्या दोन्ही पुरस्काराच्या नियमावली व इतर अनुषंगिक बाबी व सदरील पुरस्काराची प्रशासकीय कार्यवाही (प्रस्ताव मागविणे, त्याची छाननी करणे व इतर कामे) करण्यासाठी पुरस्कार कार्यासनास हस्तांतरण करण्याची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ शैक्षणिक उत्कृष्टता (ॲकॅडमिक एक्सलन्स) पुरस्कार व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ तरुण शास्त्रज्ञ (यंग सायंटिस्ट) पुरस्काराची नियमावली व इतर अनुषंगिक बाबी संदर्भात गठित समितीकडे पुर्नविचारार्थ ठेवण्यात यावा व त्यानंतर व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १० ] | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७२ (२) (ख) नुसार, परिनियम समितीवर एक अधिष्ठाता यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७२(२) नुसार परिनियम समिती गठीत करण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. त्यामधील ७२(२)(ख) नुसार परिनियम समितीवर एक अधिष्ठाता यांचे व्यवस्थापन परिषदेकडून नामनिर्देशन करावयाचे आहे.<br>वरील तरतूदीनुसार नामनिर्देशन करण्यासाठी दि.१९/०५/२०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठराव क्र.५ अन्वये डॉ. वसंत गुरुशांत कोरे, प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा यांचे नामनिर्देशन करण्यात आले होते. त्यानुसार दि.१३/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये संबंधीतांना कळविण्यात आले होते. सद्यस्थितीत डॉ. वसंत गुरुशांत कोरे यांच्या ऐवजी डॉ. आय. जे. तांबोळी यांची मानवविज्ञान विद्याशाखेच्या प्रभारी अधिष्ठाता पदी नामनिर्देशन करण्यात आलेली आहे. त्यामूळे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७२(२)(ख) नुसार परिनियम समितीवर एका अधिष्ठाताचे नामनिर्देशन करावे लागणार आहे.<br>सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७२(२)(ख) नुसार, परिनियम समितीवर एक अधिष्ठाता यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७२ (२) (ख) नुसार, डॉ. आय. जे. तांबोळी, प्र.अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा यांचे सर्वानुमते परिनियम समितीवर नामनिर्देशन करण्यात आले.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ११ ] | **प्रा. जे. बी. जोशी यांना D.Sc. व श्री. गिरीष यशवंत प्रभुणे यांना D. Lit या मानद पदवीने सन्मानित करण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**<br>टिपणी:<br>१) S. Ramamoorthy, LOK BHAVAN, Joint Secretary to the Governor of Maharashtra, RB/Edn.१/ PAHSU-२०२६/CR-००४/९३ dt.०४/०२/२०२६<br>२) प्रस्तुत विद्यापीठाचे Ref. No. PAHSUS/VC/२०२५/१४५ dt.२३/१२/२०२५.<br>३) प्रस्तुत विभागाच्या दि. १८/१२/२०२५ रोजीच्या टिपणीवरील मा. कुलगुरु महोदय यांची मान्यता.<br>उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये प्रा. जे. बी. जोशी यांना D.Sc. व श्री गिरीष यशवंत प्रभुणे यांना D.Lit. या मानद पदवीबाबत पत्र प्राप्त झाले आहे. तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२९ :२०१८ चा एकरुप परिनियम क्रमांक ३:<br>• सन्मान पदव्या आणि विद्याविषयक विशेषोपाधी - (१) विद्यापीठ दर वर्षी विज्ञान, तंत्रज्ञान, समाजशास्त्र, विधि भौतिक विज्ञान, कला, साहित्य, इ. क्षेत्रांमधील जास्तीत जास्त दोन सन्मान्य पदव्या किंवा विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करता येतील. २) सन्मान्य पदव्या किंवा विद्याविषयक विशेषोपाधी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभामध्ये प्रदान करण्यात येतील.<br>• सन्मान्य पदव्या किंवा विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करण्यासाठीची कार्यपध्दती - १) कुलगुरु, स्वत:च्या शिफारशीसह, सन्मान्य पदवी किंवा विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करण्यासंदर्भातील नामनिर्देशने कुलपतींकडे पाठवू शकतील. २) कुलपतीकडून शिफारस प्राप्त झालेली नामनिर्देशने, कुलगुरु, सन्मान्य पदवी किंवा विद्याविषयक विशेषोपाधी प्रदानाच्या कारणासाठी व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवतील.<br>सबब, प्रा. जे. बी. जोशी यांना D.Sc. व श्री. गिरीष यशवंत प्रभुणे यांना D.Lit. या मानद पदवीने सन्मानीत करण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ. | परीक्षा व मूल्यमापन विभाग |
| ठराव: | **प्रा. जे. बी. जोशी यांना D.Sc. व श्री. गिरीष यशवंत प्रभुणे यांना D.Lit या मानद पदवीने सन्मानित करण्याबाबत अधिसभेस सर्वानुमते शिफारस करण्यात आली.**<br>**तसेच मा. शरदचंद्रजी पवार व मा. नामदार नितीनजी गडकरी यांना D.Lit या मानद पदवीने सन्मानित करण्याबाबत मा.कुलपती कार्यालयास प्रस्ताव पाठविण्यात यावा अशी शिफारस करण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १२ ] | **प्रस्तुत विद्यापीठात कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ व सुरक्षा अधिकारी, सुरक्षा रक्षक पुरवठा करण्याकरिता ई-निविदेची प्रक्रिया सुरु करण्याची बाब व पुरवठादार यांना ०३ वर्षाकरिता पुरवठा आदेश देण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठात कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ व सुरक्षा अधिकारी, सुरक्षा रक्षक पुरवठा करण्याकरिता मे. रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲण्ड सिस्टीम लिमिटेड या फर्म सोबत केलेला करार दि.११/०८/२०२५ रोजी संपुष्टात आला होता. दि.२५/०८/२०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठराव क्र.१४(४) च्या अनुषंगाने सदर फर्मला दि.१२/०८/२०२५ पासून ११ महिन्याची मुदतवाढ देण्यात आली आहे. सदर मुदतवाढ ही दि.११/०७/२०२६ रोजी संपुष्टात येईल. यास्तव, माहे फेब्रुवारी, २०२६ पासून ई-निविदेची प्रक्रिया सुरु केल्यास वेळेत प्रक्रिया पुर्ण होईल अशी या विभागाची धारणा आहे.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठात कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ व सुरक्षा अधिकारी, सुरक्षा रक्षक पुरवठा करण्याकरिता ई-निविदेची प्रक्रिया सुरु करण्याची बाब व पुरवठादार यांना ०३ वर्षाकरिता पुरवठा आदेश देण्याची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठात कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ व सुरक्षा अधिकारी, सुरक्षा रक्षक पुरवठा करण्याकरिता ई-निविदेची प्रक्रिया सुरु करण्यास व पुरवठादार यांना ०३ वर्षाकरिता पुरवठा आदेश देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १३ ] | पीएम-उषा योजनेच्या सॉफ्ट कॉम्पोनंट घटका अंतर्गत "Research Project (Major, Minor and Multi-Disciplinary Research Project), Skill Training Programme, Boot Camp, Capacity Building Programme, Faculty Development Programme, Community Outreach, Students Exchange, Industry Visit, Internship, Bridge Course, Seed Money, MoU Collaboration" हे उप्रकम राबविण्याकरीता तयार करण्यात आलेल्या मानक कार्यप्रणाली (SoP) विचारार्थ.<br>टिपणी: पीएम-उषा योजने अंतर्गत Multi-disciplinary Education and Research Universities (MERU) Part-१ अंतर्गत प्रस्तुत विद्यापीठास १०० कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यानुसार सॉफ्ट कॉम्पोनंट घटका अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यासाठी रु.५,०६,००,०००/- इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.<br>सदर उपक्रमांतर्गत रुसा कार्यालय, मुंबई यांनी आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय व राज्यस्तरीय परिषदा, कार्यशाळा यांकरीता मानक कार्यप्रणाली (SoP) निश्चित केलेली आहे. परंतु इतर उपक्रम जसे Research Project (Major, Minor and Multi-Disciplinary Research Project), Skill Training Programme, Boot Camp, Capacity Building Programme, Faculty Development Programme, Community Outreach, Students Exchange, Industry Visit, Internship, Bridge Course, Seed Money, MoU Collaboration इ. करीता स्वतंत्र मानक कार्यप्रणाली (SoP) उपलब्ध नसल्यामुळे मा.कुलगुरु महोदय यांनी विद्यापीठ संकुलातील प्राध्यापकांची समिती गठीत केली होती. सदर समितीने उक्त नमूद उपक्रमांसाठी मानक कार्यप्रणाली (SoP) सादर केले आहे. त्यानुसार सदर मानक कार्यप्रणाली (SoP) मंजूरीसाठी रुसा कार्यालय, मुंबई यांना पाठविण्यात आले आहे. याबाबत सदर कार्यालयास मानक कार्यप्रणाली मंजूरी मिळणेसाठी पाठपुरावा करण्यात येत असून अद्याप मंजूरी अप्राप्त आहे. रुसा कार्यालय, मुंबई यांनी दि. १७/१२/२०२५ रोजीच्या ई-मेलमार्फत प्रस्तावित सर्व उपक्रम हे केवळ पीएम-उषा अंतर्गत मंजूर प्रस्ताव व सविस्तर प्रकल्प अहवाल यानुसारच असणे आवश्यक आहे. तसेच संलग्न युजीसी मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे अपेक्षित आहे. मंजूर DPR मध्ये नमूद नसलेले अथवा नसलेले कोणतेही कार्यक्रम पीएम-उषा निधीतून वित्त पुरवठ्यास पात्र राहणार नाहीत अशा परीस्थितीत संबंधित कार्यक्रमाचा संपूर्ण खर्च संबंधित विद्यापीठाने स्वत:च्या निधीतून करावयाचा राहील याची नोंद द्यावी व पुढील कार्यवाही करावी असे कळविले आहे. त्यामुळे विद्यापीठ संकुलातील गठीत समितीने तयार केलेला मानक कार्यप्रणाली नुसार उपक्रम राबवावे लागणार आहे.<br>सबब, पीएम-उषा योजनेच्या सॉफ्ट कॉम्पोनंट घटका अंतर्गत "Research Project (Major, Minor and Multi-Disciplinary Research Project), Skill Training Programme, Boot Camp, Capacity Building Programme, Faculty Development Programme, Community Outreach, Students Exchange, Industry Visit, Internship, Bridge Course, Seed Money, MoU Collaboration" हे उप्रकम राबविण्याकरीता तयार करण्यात आलेल्या मानक कार्यप्रणाली (SoP) विचारार्थ. | पीएम-उषा विभाग |
| ठराव: | **पीएम-उषा योजनेच्या सॉफ्ट कॉम्पोनंट घटका अंतर्गत "Research Project (Major, Minor and Multi-Disciplinary Research Project), Skill Training Programme, Boot Camp, Capacity Building Programme, Faculty Development Programme, Community Outreach, Students Exchange, Industry Visit, Internship, Bridge Course, Seed Money, MoU Collaboration" हे उप्रकम राबविण्याकरीता तयार करण्यात आलेल्या मानक कार्यप्रणालीस (SoP) सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ १४ ]</td><td>पीएम-उषा योजनेच्या MERU प्रकल्पांमधून इक्युपमेंट घटका अंतर्गत विद्यापीठ विविध संकुल आणि प्रशासकीय विभागांकरीता ३०० संगणक (I ७ Series) खरेदी करण्यासाठी लागणाऱ्या अधिकच्या रु. ६५ लाख (रुपये पासष्ठ लाख फक्त) खर्च विद्यापीठ फंडातून खर्ची टाकण्याची माहिती व तंत्रज्ञान मंडळाने केलेली शिफारस विचारार्थ.<br><br>टिपणी: पीएम-उषा योजने अंतर्गत Multi-disciplinary Education and Research Universities (MERU) Part-१ अंतर्गत प्रस्तुत विद्यापीठास १०० कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यानुसार सदर घटकांतर्गत रु.३६,२५,२०,९२९/- इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.<br><br>सदर घटकांतर्गत प्रस्तुत विद्यापीठ विविध संकुलांकरीता व प्रशासकीय विभागांकरीता ३०० नग संगणक खरेदीसाठी रु. २.२५ कोटी मंजूर असून, सदर खरेदीसाठी दि.०७/०६/२०२४ रोजी मा. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये तसेच दि.०७/०१/२०२६ रोजीच्या बैठकीमध्ये उक्त खर्चाची मान्यता घेण्यात आली आहे.<br><br>तथापि, उक्त उपकरण खरेदीपूर्वी डॉलरच्या किमतीमध्ये वाढ झाल्याने ३०० संगणक खरेदीसाठी अंदाजे प्रति नग ९५,०००/- प्रमाणे रु. २.८५ कोटी रक्कम होत असून यापूर्वी मा. व्यवस्थापन परिषदेमध्ये रु. २.२५ कोटी रक्कमेस मान्यता देण्यात आली आहे. परंतू सध्याच्या बाजारभावानुसार रु. ६० लाख अधिक होत आहे. तसेच उक्त ३०० संगणकातील ४० संगणक भूशास्त्र संकुलास द्यावयाचे असून त्या संगणकाकरीता ग्राफीक्स कार्ड लावावयाचे असल्याने त्यासाठी प्रति ग्राफीक्स कार्ड अंदाजे रु. १२,५००/- प्रमाणे ५ लाख जास्तीचा खर्च असे एकूण ६५ लाख खर्च विद्यापीठ फंडातून करणेबाबत दिनांक ५/२/२०२६ रोजी संपन्न झालेल्या माहिती व तंत्रज्ञान मंडळाच्या बैठकीमध्ये विषय क्र.२ नुसार ठेवला असता त्यांनी वरील प्रमाणे संगणक खरेदी करण्याची शिफारस केली आहे.<br><br>या अनुषंगाने पीएम-उषा योजने अंतर्गत ३०० संगणक खरेदी साठी रु. २.२५ कोटी मंजूर असल्याने नवीन बाजारभावाप्रमाणे रु. ६५ लाख (रुपये पासष्ठ लाख फक्त) अधिकचा खर्च होत असून सदरचा खर्च हा विद्यापीठ फंडातून खर्ची करणे आवश्यक आहे.<br><br>सबब, पीएम-उषा योजनेच्या MERU प्रकल्पांमधून इक्युपमेंट घटका अंतर्गत विद्यापीठ विविध संकुल आणि प्रशासकीय विभागांकरीता ३०० संगणक (I ७ Series) खरेदी करण्यासाठी लागणाऱ्या अधिकच्या रु. ६५ लाख (रुपये पासष्ठ लाख फक्त) खर्च विद्यापीठ फंडातून खर्ची टाकण्याची माहिती व तंत्रज्ञान मंडळाने केलेली शिफारस विचारार्थ.</td><td>पीएम-उषा विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>पीएम-उषा योजनेच्या MERU प्रकल्पांमधून इक्युपमेंट घटका अंतर्गत विद्यापीठ विविध संकुल आणि प्रशासकीय विभागांकरीता ३०० संगणक (I ७ Series) खरेदी करण्यासाठी लागणाऱ्या अधिकच्या रु. ६५ लाख (रुपये पासष्ठ लाख फक्त) खर्च विद्यापीठ फंडातून खर्ची टाकण्याची माहिती व तंत्रज्ञान मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.</td><td></td></tr>
</table>

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १५ ] | दि.०५/०२/२०२६ रोजीच्या माहिती व तंत्रज्ञान मंडळाच्या बैठकीचा कार्यवृत्तांत विचारार्थ.<br><br>टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ४९ अन्वये माहिती व तंत्रज्ञान मंडळ (IT Cell) ची स्थापना करण्यात असून सदर मंडळाची दि.०५/०२/२०२६ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये Computer, Hardware & Software संदर्भातील Configuration तयार करणे, त्यासाठी अंदाजित येणाऱ्या खर्चाची व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आलेली आहे.<br><br>सबब, दि.०५/०२/२०२६ रोजीच्या माहिती व तंत्रज्ञान मंडळाच्या बैठकीचा कार्यवृत्तांत विचारार्थ. | माहिती व तंत्रज्ञान मंडळ |
| ठराव: | दि.०५/०२/२०२६ रोजीच्या माहिती व तंत्रज्ञान मंडळाच्या बैठकीचा कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

Mahde

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय:

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१६(१)] | **अधिसभा सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांवर अधिसभेच्या बैठकीत उत्तरे देण्याकरिता व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: अधिसभेची ३७ वी बैठक दि.१८ फेब्रुवारी, २०२६ रोजी सकाळी ११:३० वा. विद्यापीठ सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. सदर बैठकीची सूचना दि.०२ फेब्रुवारी, २०२६ रोजी सर्व सदस्यांना पाठविण्यात आली असून दि.०३ जुलै, २०२३ रोजीच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या पत्रानुसार, अधिसभा सदस्यांनी बैठकीसाठी प्रश्न, प्रस्ताव पाठविण्याची अंतिम तारीख दि.०७/०२/२०२६ रोजी सायं. ०६:०० पर्यंत होती. त्यानुसार अधिसभा सदस्यांनी अधिसभेच्या बैठकीकरिता पाठविलेल्या प्रश्नांची उत्तरे कार्यालयाकडून तयार करुन २०१९ चा एकरुप परिनियम क्रमांक ४ मधील नियम क्र. ६ (१३) नुसार, व्यवस्थापन परिषद अधिसभेच्या बैठकीत त्यांना द्यावयाची उत्तरे तयार करील.<br>सबब, अधिसभेच्या सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची अधिसभेच्या बैठकीत उत्तरे देण्याकरिता व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे नामनिर्देशनाची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | **सोबत जोडल्याप्रमाणे प्रश्नांची उत्तरे निश्चित करण्यात आली व प्रश्नाची उत्तरे देण्यासाठी व्यवस्थापन परिषद सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात आले.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१६(२)] | **प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील माळी काम करणाऱ्या कर्मचारी यांना माळी कामाकरिता आवश्यक साहित्य व माळी कामगारांवर नियंत्रण, कामाची विभागणी व काम व्यवस्थित वेळेत पूर्ण होण्याकरीता बाह्ययंत्रणेद्वारे आस्थापना विभागामार्फत ठेकेदाराची नेमणूक करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठ परिसराची स्वच्छता करण्याकरिता बाह्यस्त्रोतमार्फत कंत्राटी माळी कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. सदरच्या कर्मचाऱ्यांकडून विद्यापीठ परिसरातील स्वच्छता करण्याकरिता साहित्य व कर्मचाऱ्यांवर निरीक्षण ठेवण्यासाठी कायम किंवा कंत्राटी कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात येत असते, त्या कर्मचाऱ्यावर विभागातील कामे व माळी कामे मिळून करण्यात येत आहे. त्यांना लागणारे आवश्यक साहित्य विद्यापीठाच्या भांडार विभागामध्ये साहित्य खरेदी करुन ठेवण्यात येत आहे. माळी कामाकरीता लागणारे साहित्याचे दर दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे जास्त प्रमाणावर त्याचा आर्थिक भार विद्यापीठावर पडत आहे. त्यामुळे विद्यापीठामध्ये कार्यरत असलेल्या कामगारांवर नियंत्रण ठेवणे, त्यांच्याकडून विद्यापीठ परिसराची स्वच्छता करुन घेणे, साहित्याचा पुरवठा करण्याकरिता वार्षिक दर करुन घ्यावे लागणार आहे.<br>सद्य:स्थितीत बाह्ययंत्रणेद्वारे कार्यरत माळी २६ असून त्यांना प्रतीदिन रु.६२४/- इतका आहे. त्यानुसार एकंदर प्रती महिना अंदाजे ३० दिवसाप्रमाणे रु.१८,७२०/- इतका होत असून २६ माळी करिता ४,८६,७२०/- इतका प्रती वर्ष खर्च होत आहे. तसेच माळी कामासाठी आवश्यक साहित्याकरिता अंदाजे रु.१,००,०००/- इतका खर्च आहे. असे एकूण अंदाजे ५,८६,७२०/- खर्च अपेक्षित आहे.<br>विद्यापीठाच्या नवीन विस्तारीत परिसरामध्ये प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन, खेलो इंडिया योजनेंतर्गत मल्टीपर्पज हॉल व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारक व टॉवरच्या परिसर सुशोभिकरण करण्याकरिता लॉन / लॅन्डस्केपिंगचे काम करण्यात आले आहे. सदरच्या मुख्य प्रशासकीय परिसरातील व वाढीव परिसरातील माळी काम करणे / गार्डनिंगचे काम करणे, लॅन्डस्केपिंगच्या परिसरातील कामे करण्याकरिता माळी कर्मचाऱ्यांची गरज आहे. त्यांच्या कामावर नियंत्रण व साहित्य खर्च वाढण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे बाह्ययंत्रणेद्वारे नेमणूक करण्यात आलेल्या माळी कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्याकरिता व साहित्य पुरवठा करणारे ठेकेदार यांची नेमणूक करणे आवश्यक आहे.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील माळी काम करणाऱ्या कर्मचारी यांना माळी कामाकरिता आवश्यक साहित्य व माळी कामगारांवर नियंत्रण, कामाची विभागणी व काम व्यवस्थित वेळेत पूर्ण होण्याकरीता बाह्ययंत्रणेद्वारे आस्थापना विभागामार्फत ठेकेदाराची नेमणूक करण्याची बाब विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | **सदरचा विषय सविस्तर माहितीसह फेरसादर करावा असे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१६(३)] | **प्रस्तुत विद्यापीठाच्या नामविस्तार दिनानिमित्त म्हणजेच ०६ मार्च रोजी प्रदान करण्यात येणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अहिल्यारत्न पुरस्काराकरीता गठीत करण्यात आलेल्या निवड समितीचा अहवालानुसार पुरस्कार वितरण करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा नामविस्तार दिनी म्हणजेच ०६ मार्च रोजी संपन्न होणार असून त्यादिनी विद्यापीठाकडून खालीलप्रमाणे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.<br>"पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अहिल्यारत्न पुरस्कार"<br>पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अहिल्यारत्न पुरस्काराकरीता मा. कुलगुरु महोदयांच्या अध्यक्षतेखाली नऊ सदस्यीय शोध समिती गठीत करण्यात आलेली होती. सदर समितीची बैठक दि.०९/०२/२०२६ रोजी विद्यापीठामध्ये संपन्न होऊन शोध समितीने सदर पुरस्काराकरीता पुरस्कर्त्याची निवड करुन त्यांचा अहवाल गोपनियरित्या सादर केलेला आहे.<br>तसेच "ज्या पुरस्कार्थींची अहिल्यारत्न पुरस्काराकरिता विद्यापीठाकडून निवड करण्यात येईल असा पुरस्कार्थी हा मूळ भारतीय असणारा परंतु परदेशात स्थायिक झालेला असला तरीही त्यांचा प्रवास, निवास व भोजनासाठी होणारा प्रत्यक्ष खर्च (विमान, कार, रेल्वे यांसह) विद्यापीठ करेल" असे शोध समितीने सर्वानुमते ठरवले आहे. त्याप्रमाणे सदर नियमावलीमध्ये नमुद करावे लागणार आहे.<br>उक्त नमूद पुरस्काराकरीता गठीत शोध समितीने गोपनीय पध्दतीने सादर केलेल्या अहवालास अनुसरुन संबंधित पुरस्कर्त्यांना विद्यापीठाच्या नामविस्तार दिनी म्हणजेच ०६ मार्च रोजी प्रदान करण्यात येणार आहे.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठाच्या नामविस्तार दिनानिमित्त ०६ मार्च रोजी प्रदान करण्यात येणाऱ्या अहिल्यारत्न पुरस्काराकरीता गठीत करण्यात आलेल्या शोध समितीच्या अहवालानुसार पुरस्कार वितरण करण्याची बाब व अहिल्यारत्न पुरस्काराच्या नियमावलीमध्ये "ज्या पुरस्कार्थींची अहिल्यारत्न पुरस्काराकरिता विद्यापीठाकडून निवड करण्यात येईल असा पुरस्कार्थी हा मूळ भारतीय असणारा परंतु परदेशात स्थायिक झालेला असला तरीही त्यांचा प्रवास, निवास व भोजनासाठी होणारा प्रत्यक्ष खर्च (विमान, कार, रेल्वे यांसह) विद्यापीठ करेल" असे नमुद करण्याची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठाच्या नामविस्तार दिनानिमित्त म्हणजेच ०६ मार्च रोजी प्रदान करण्यात येणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अहिल्यारत्न पुरस्काराकरीता गठीत करण्यात आलेल्या निवड समितीचा अहवालातील अ.क्र. १ व २ यांनी असमर्थता दर्शविल्याने "सौ. मंदाताई आमटे" यांना पुरस्कार वितरण करण्यास व अहिल्यारत्न पुरस्काराच्या नियमावलीमध्ये वरीलप्रमाणे दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१६(४)] | **दि.१०/०२/२०२६ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या तातडीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ.**<br>टिपणी: विद्यापीठ परिसरातील विविध इमारत व बांधकाम करणे कामाकरीता दि.१०/०२/२०२६ रोजी इमारत व बांधकाम समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.<br>सबब, विद्यापीठ परिनियम S.३३९ (f) नुसार इमारत व बांधकाम समितीच्या इतिवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेण्याची तरतूद आहे. त्यानुसार दि.१०/०२/२०२६ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | **दि.१०/०२/२०२६ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१६(५)] | "उत्कृष्ट व्यवस्थापन परिषद सदस्य" पुरस्कार देण्याची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | "उत्कृष्ट व्यवस्थापन परिषद सदस्य" पुरस्कार देण्यासाठी पुरस्काराचे स्वरुप व नियमावली ठरविण्यासाठी सर्वानुमते खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.<br>१. डॉ. अजित माधव पाटणकर – अध्यक्ष<br>२. डॉ. प्रशांत मारुती पवार – सदस्य<br>३. डॉ. सुशिल कुमार शिंदे – सदस्य<br>४. डॉ. अतुल लकडे, प्र. कुलसचिव – सदस्य सचिव<br>तसेच सदर समितीने अहवाल ०२ महिन्यात सादर करावा असे ठरले. | |

मा. कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे प्र.कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## प्रश्नोत्तरे

अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न व त्यावर अंतिम केलेली उत्तरे

| अ.क्र. | ॲड. निता सुरेशबाबू मंकणी | डॉ. प्रशांत मारुती पवार |
|---|---|---|
| १) | प्रश्न १ | विद्यापीठाने 'Autonomous College Data Uploading Fee' या नावाखाली विद्यार्थ्यांकडून शुल्क वसूल करण्याची चुकीची व अन्यायकारक पध्दत सुरु ठेवण्याचा निर्णय नेमका कोणाच्या हितासाठी घेतला आहे - विद्यार्थ्यांच्या हितासाठी की EDU LAB या खासगी संस्थेला आर्थिक लाभ देण्यासाठी? [पीजी. प्रवेश विभाग] |
| | उत्तर | **सदर प्रश्नाचा अर्थबोध होत नाही. तथापि, सदरचा निर्णय हा दि.०३/०९/२०२४ रोजीच्या विद्यापरिषदेच्या ठरावानुसार गठीत समितीने दिलेला अहवाल हा व्यवस्थापन परिषदेच्या दि.२५/०८/२०२५ रोजी ठराव क्र.८ नुसार स्वीकृत केलेला आहे. त्या ठरावानुसार दि.२०/०९/२०२५ व दि.०९/१२/२०२५ नुसार सर्व स्वायत्त महाविद्यालयास कळविण्यात आलेले आहे. तथापि, शासनाने Autonomous College Data Uploading Fee सन २०२१ ते आजपर्यंत विद्यार्थ्यांची प्रवेश, परीक्षा, निकालाची तारीख व महाविद्यालयांच्या प्राध्यापकांची माहिती इत्यादीची मागणी केलेली आहे.** |
| २) | प्रश्न २ | विद्यार्थ्यांकडून शुल्क वसुली ही चुकीची पध्दत तात्काळ थांबवून हा विषय व्यवस्थापन बैठकीत पुनर्विचारासाठी मांडण्यास विद्यापीठ तयार आहे का? [ पीजी. प्रवेश विभाग] |
| | उत्तर | **निरंक.** |
| ३) | प्रश्न ३ | यातील प्रशासकीय प्रक्रिया विद्यार्थ्यांकडून पैसे घेऊन पार पाडणे ही चुकीची पध्दत असल्याचे विद्यापीठ मान्य करणार आहे काय, की हीच पध्दत अधिकृत धोरण म्हणून स्वीकारली जात आहे? [पीजी. प्रवेश विभाग] |
| | उत्तर | **निरंक.** |
| | श्रीमती रोहिणी आर. तडवळकर | डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर |
| ४) | प्रश्न १ | युवा स्पंदन हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी आहे की खुला आहे? [विद्यार्थी विकास विभाग] |
| | उत्तर | **शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा युवा स्पंदन सांस्कृतिक महोत्सव विद्यार्थी, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांच्यासाठी आयोजित करण्यात आला होता. वार्षिक स्नेहसंमेलन यालाच युवा स्पंदन म्हणतात. ज्यामध्ये कला, क्रीडा, सांस्कृतिक व इतर कार्यक्रम आयोजित केले जातात.** |
| ५) | प्रश्न २ | पी. एचडी. कोर्स वर्क परीक्षा ही प्रात्यक्षिक परीक्षा आहे की थिअरी परीक्षा आहे? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| | उत्तर | **पी. एचडी. कोर्स वर्क परीक्षा ही थेअरी (Theory Paper) परीक्षा आहे.** |
| | ॲड. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे | डॉ. आय. जे. तांबोळी |
| ६) | प्रश्न १ | विद्यापीठाची नवीन इमारत बांधण्यापूर्वी पर्यावरण मंजुरी व वन विभागाची NOC, Environmental Clearance रिपोर्ट घेतली गेली होती का? तसेच, त्यासाठी कायदेशीर परवानग्या (वन संरक्षण कायदा १९८०, Maharashtra Tree Felling Act व इतर संबंधित कायदे) पूर्ण पध्दतीने मंजुरी घेतली गेली होती का? [अभियांत्रिकी विभाग] |
| | उत्तर | **होय, बांधकामासाठी लागणाऱ्या सर्व परवानग्या घेतल्या आहेत.** |

| | | |
|---|---|---|
| ७) | प्रश्न २ | प्रस्तुत विद्यापीठाच्या कॅन्टीनजवळील झाडे का तोडण्यात आली? या वृक्षतोडीसंबंधी सर्व कायदेशीर प्रक्रिया व परवानग्या घेतल्या गेल्या होत्या का? [अभियांत्रिकी विभाग] |
| | उत्तर | विद्यापीठ नवीन विस्तारीत परीसरामध्ये विद्युत कनेक्शनकरीता महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ यांच्यामार्फत एक्सप्रेस लाईन टाकण्याचे काम सुरु असून सदरची एक्सप्रेस लाईन ही विद्यापीठ परिसरातील उपहारगृहाच्या मागील बाजूने टाकण्यात येत होती. सदरचे काम करताना वृक्षांची अडचण निर्माण झाली. तसेच झाडे ठेवून तारे ओडण्याचे काम शक्य नव्हते. सदरची वृक्षे ही शेवरी या झूडपे प्रकारची असून ती फक्त छाटण्यात आली आहेत. |
| | डॉ. विरभद्र चनबस दंडे | डॉ. समाधान दिगंबर पवार |
| ८) | प्रश्न १ | आपल्या विद्यापीठातील प्राध्यापकांच्या विविध स्टेजवरील स्थान निश्चितीसाठी जून २०२३ ते डिसेंबर २०२५ पर्यंत विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेरी किती प्राध्याकाना बोलावण्यात आले आहे? [शिक्षक मान्यता विभाग / आस्थापना विभाग] |
| | उत्तर | • प्रस्तुत विद्यापीठामध्ये शिक्षकांचे कॅस अंतर्गत स्थाननिश्चिती/पदोन्नतीकरीता विविध स्टेज १ ते ५ करीता जून, २०२३ ते डिसेंबर, २०२५ पर्यंत संलग्नित महाविद्यालयात विविध विषयांकरीता प्रस्तुत विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेरील एकूण ७८ प्राध्यापकांना विद्यापीठ नियमानुसार स्थाननिश्चिती / पदोन्नतीकरीता बोलविण्यात आलेले आहे.<br>• प्रस्तुत विद्यापीठ परिसर शैक्षणिक संकुलातील नियमित पदावर कार्यरत अध्यापकांना कॅस अंतर्गत विविध स्टेज वरील स्थान निश्चितीसाठी गठीत करावयाच्या निवड समितीमध्ये शासन निर्णय दि.०८ मार्च, २०१९ मधील तरतूदीनुसार जून, २०२३ ते डिसेंबर, २०२५ या कालावधीत विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेरील एकूण २१ प्राध्यापकांना बोलविण्यात आले आहे. |
| ९) | प्रश्न २ | मागील नॅक प्रोसेस मध्ये ग्रेड कमी मिळण्यामध्ये संशोधन या घटकाचा मोठा वाटा होता, तो वाढवण्यासाठी विद्यापीठाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत? [नॅक विभाग] |
| | उत्तर | • विद्यापीठ स्तरावर Research Devlopment Cell (RDC) ची स्थापना करण्यात आलेली असून, संशोधन प्रस्ताव तयार करणे, प्रकल्प मार्गदर्शन, निधी संकलन व प्रकाशनासाठी सहाय्य करण्यात येत आहे.<br>• राजीव गांधी सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी आयोग (RGSTC) अंतर्गत शिक्षक व संशोधकांचे प्रकल्प संशोधनासाठी मंजूर करण्यात आले असून, बाह्य निधी मिळवण्यावर भर देण्यात येत आहे.<br>• संशोधन निष्पत्तींचे बौध्दिक संपदा हक्क संरक्षित करण्यासाठी Patent दाखल करण्यासाठी शिक्षकांना प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देण्यात येत आहे. |
| | श्री. संजय नामदेव साळुंखे | डॉ. सुशिल कुमार शिंदे |
| १०) | प्रश्न १ | एक पूर्णवेळ इंजिनिअर असताना सुध्दा दुसरा कंत्राटी इंजिनिअर नेमणूक करण्याची आवश्यकता काय आहे? [अभियांत्रिकी विभाग] |
| | उत्तर | प्रस्तुत विद्यापीठाच्या स्थापत्य कामकाजाचा आवाका पाहता कंत्राटी सिव्हिल इंजिनिअरची अत्यंत आवश्यकता आहे. |
| ११) | प्रश्न २ | विद्यापीठ परिक्षेत्रातील जमिनीचे कामकाज पाहण्यासाठी स्वतंत्र कंत्राटी व्यक्ती नेमण्यात आला आहे याचे कारण काय? [अभियांत्रिकी विभाग] |
| | उत्तर | होय, विद्यापीठ ४८२ एकर जमिनीचे संपादन २००६ रोजी करण्यात आले होते. सदरच्या ठिकाणी मुख्य प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करते वेळी वन विभागाकडून माळढोक पक्षी अभिअरण्याचे आरक्षण लागू असल्याचे कळविले. सदरबाबत न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली असून, त्याअनुषंगाने भूमी अभिलेख कार्यालयामध्ये काम केलेले सेवा निवृत्त तज्ञ व्यक्तीची नेमणूक करुन जमिनीचा विषय मार्गी लावण्याकरीता नेमणूक केलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | श्री. अजितकुमार बापूराव संगवे | श्री. महादेव धरेप्पा कमळे |
| १२) | प्रश्न १ | विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळामध्ये (Board of Sports) विविध क्रीडा क्षेत्रातील विश्वसनियता सिध्द केलेले, कुलगुरुनी नामनिर्देशित केलेले तीन व्यावसायिक कोण कोण आहेत? [क्रीडा व शारीरिक शिक्षण] |
| | उत्तर | **विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळामध्ये (Board of Sports) विविध क्रीडा क्षेत्रातील विश्वसनियता सिध्द केलेले कुलगुरुंनी नामनिर्देशित केलेले तीन व्यवसायीक (Professional)** <br> **१) डॉ. किरण चौगुले २) डॉ. किरण चोकाककर ३) डॉ. दत्तात्रय बिराजदार** |
| १३) | प्रश्न २ | जानेवारी २०२६ मध्ये झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ मैदानी स्पर्धेसाठी विद्यापीठाचा संघ जाण्यापूर्वी विद्यापीठाच्या या संघाचे स्पर्धापुर्व प्रशिक्षण शिबिर झाले आहे का? [क्रीडा व शारीरिक शिक्षण] |
| | उत्तर | **जानेवारी २०२६ मध्ये झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ मैदानी स्पर्धेसाठी विद्यापीठाचा संघ जाण्यापूर्वी विद्यापीठाच्या या संघाचे स्पर्धापुर्व प्रशिक्षण शिबीराचे आयोजन दि.३१ डिसेंबर, २०२५ ते दि.०९ जानेवारी, २०२६ या कालावधीत D.B.F. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड सायन्स, सोलापूर येथे करावे असे पत्र निर्गमित केले होते. परंतू संघाचे स्पर्धापुर्व प्रशिक्षण शिबीर झाले नाही.** |
| १४) | प्रश्न ३ | जानेवारी २०२६ मध्ये झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ मैदानी स्पर्धेत सहभागी झालेल्या सोलापूर विद्यापीठाच्या महिला संघाबरोबर महिला संघ व्यवस्थापिका कोण गेल्या होत्या? [क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग] |
| | उत्तर | **जानेवारी २०२६ मध्ये झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ मैदानी स्पर्धेत सहभागी झालेल्या सोलापूर विद्यापीठाच्या महिला संघाबरोबर महिला संघ व्यवस्थापिका गेल्या नव्हत्या.** |
| | श्री. चनबसप्पा गुंडप्पा बंकुर | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे |
| १५) | प्रश्न १ | विद्यापीठ स्थापनेपासून आज पर्यंत किती कंत्राटी कर्मचारी यांना एकत्रित वेतन देण्यात येते? [आस्थापना विभाग] |
| | उत्तर | **विद्यापीठ स्थापनेपासून कंत्राटी कर्मचारी यांना एकत्रित वेतन देण्यात आले नाही. परंतु सन २०१८ पासून ठेकेदारामार्फत देण्यात येत आहे. सद्यस्थितीत एकूण १८ कंत्राटी कर्मचारी ठेकेदारामार्फत एकत्रित वेतनावर कार्यरत आहेत.** |
| | डॉ. जैनोद्दीन खतालसो मुल्ला | डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर |
| १६) | प्रश्न १ | शेक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये पीएम उषा योजनेअंतर्गत किती देयके अदा करण्यात आली आहेत? [वित्त व लेखा विभाग] |
| | उत्तर | **शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये पीएम उषा योजनेअंतर्गत Renovation Component ची ४ देयके Equipment Component ची १२ देयके Soft-Component ची २३ देयके एकूण ३९ देयके आदा करण्यात आली आहेत.** |
| १७) | प्रश्न २ | अकॅडमिक अँड ऍडमिनिस्ट्रेटिव्ह ऑडिट (AAA) कमिटी साठी व्यवस्थापन परिषद, विद्यापरिषद व सिनेट सभागृहाने नामनिर्देशन केलेल्या सदस्या व्यतिरिक्त किती शिक्षकांना सदर समितीवर पाठवण्यात आले? [संलग्नता विभाग] |
| | उत्तर | **अकॅडमिक अँड ऍडमिनिस्ट्रेटिव्ह ऑडिट (AAA) कमिटी साठी व्यवस्थापन परिषद, विद्यापरिषद व सिनेट सभागृहाने नामनिर्देशन केलेल्या सदस्या व्यतिरिक्त एकही शिक्षकांना सदर समितीवर पाठवण्यात आलेले नाही.** |

१८) प्रश्न ३ प्रस्तुत विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ व २०२५-२०२६ मध्ये संपन्न झालेल्या आधीसभेत पारित केलेल्या विविध ठरावा संदर्भात जानेवारी २०२६ अखेरपर्यंत काय कार्यवाही करण्यात आली आहे?

[सभा व निवडणूका विभाग]

उत्तर २०१९ चा एकरुप परिनियम क्रमांक ४ नुसार कार्यवाही करण्यात आली आहे.

श्री. सिध्देश्वर बाबु स्वामी — सीए महादेव सोमशंकर खराडे

१९) प्रश्न १ परीक्षा विभागाकडे व अकाउंट विभागाकडे एकूण किती महाविद्यालयाची देयके प्रलंबित आहेत?

[वित्त व लेखा विभाग / परीक्षा व मूल्यमापन विभाग]

उत्तर

- या विभागाकडे सद्यस्थितीत एकूण ०८ महाविद्यालयाची देयके असून त्यावर आदायगीची प्रक्रिया सुरु आहे. सदर देयके पुढील ०८ दिवसांत संबंधित महाविद्यालयांना आदा करण्यात येतील.
- काही महाविद्यालयांची देयके वेळेवर जमा केली जात नसल्याने विद्यापीठाच्या सर्व संलग्नित महाविद्यालयांना जा.क्र.पुअहोसोविसो / पवमूमं / देयक विभाग / २३४७, दि.०२/१२/२०२५ रोजीच्या पत्रकाद्वारे कळविण्यात आले होते. (सोबत जोडले आहे) परीक्षा संपन्न झाल्यानंतर देयकांचे प्रस्ताव (फाईल) १० दिवसाच्या आत विद्यापीठाकडील परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडे जमा करण्यात यावेत. त्यानुसार महाविद्यालयांनी जानेवारी, २०२६ मध्ये परीक्षा पूर्ण झाल्यानंतर देयकाच्या फाईल सादर करत आहेत. तसेच काही महाविद्यालयांनी त्यांचे ऑक्टो/नोव्हे २०२४, मार्च/एप्रिल २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेचे देयके जमा केली होती. त्यामध्ये देयक तपासणी करतेवेळी काही महाविद्यालयांच्या देयकामध्ये त्रुटी निदर्शनास येतात. (उदा. रक्कम कमी-जास्त असणे, प्राचार्यांची सही व शिक्का नसणे, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सही नसणे, परीक्षेचा सत्र चार्ट नसणे, देयकामध्ये बेरीज तफावत असणे) अशा काही त्रुटीचे महाविद्यालयांकडून निराकरण करुन घेवून पुनश्च: देयके तपासून वित्त व लेखा विभागाकडे पाठविण्यात आले आहेत.

महाविद्यालयांची देयके परीक्षा पूर्ण झाल्यावर (दि.१५ जानेवारी, २०२६ पासून ते आज तगायत) आलेले असून सध्या परीक्षा व मूल्यमापन मंडळ (देयक) विभागाकडे एकूण १२ महाविद्यालयांच्या देयकांच्या फाईल असून (महाविद्यालयांच्या फाईल ०१ ते ०४ च्या पटीत असून) सदर फाईल मध्ये वरीलप्रमाणे नमूद करण्यात आलेल्या त्रुटी तपासून पुढील कार्यवाही करीता वित्त व लेखा विभागाकडे पाठविण्यात येतात.

| अ.क्र. | कॉलेज | फाईल जमा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| १) | College of Education Barshi | १६/०१/२०२६ | तपासणीचे काम चालू आहे. |
| २) | College of Pharmacy, Pandharpur | १७/०१/२०२६ | |
| ३) | College of Pharmacy, Akluj | १७/०१/२०२६ | |
| ४) | Dr. Ganpatrao Deshmukh College | १९/०१/२०२६ | |
| ५) | Kai. Ganesh (kaka) Kulkarni Science College | २०/०१/२०२६ | |
| ६) | D. H. B. Soni College | २२/०१/२०२६ | |
| ७) | D. P. B. Dayanand College of Education | २३/०१/२०२६ | |
| ८) | Matoshri Gurubasavva Kalyanshetti College | २७/०१/२०२६ | |
| ९) | Vithalrao Shinde Arts College | २९/०१/२०२६ | |
| १०) | Yashwantrao Chavan Mahavidyalaya | ३०/०१/२०२६ | |
| ११) | Uma Mahavidyalaya | ०२/०२/२०२६ | |
| १२) | Uma Mahavidyalaya CAP Centre | ०२/०२/२०२६ | |

परीक्षा विभागाकडे मागील कोणतेही देयके प्रलंबित नाहीत. वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या फाईल तपासणीचे कामकाज चालू आहे. पुढील ०८ दिवसात तपासणीचे कामकाज पूर्ण झाल्यावर पुढील कार्यवाहीकरीता वित्त व लेखा विभागाकडे पाठविण्यात येईल.

<table>
<tr><td>२०)</td><td>प्रश्न २</td><td colspan="4">२०२५-२६ मध्ये विद्यापीठातील विविध अध्यासन केंद्रामार्फत कोणकोणते उपक्रम राबवण्यात आले? [सर्व अध्यासन केंद्र]</td></tr>
<tr><td></td><td>उत्तर</td><td colspan="4">२०२५-२६ मध्ये विद्यापीठातील विविध अध्यासन केंद्रामार्फत व्याख्यान, सांस्कृतिक कार्यक्रम, प्रबोधनपर व्याख्याने इत्यादी उपक्रम राबविण्यात आले.</td></tr>
<tr><td></td><td colspan="2">डॉ. श्रीमती सीमा अण्णासाहेब गायकवाड</td><td colspan="3">प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड</td></tr>
<tr><td>२१)</td><td>प्रश्न १</td><td colspan="4">२०२४-२५ व २०२५-२६ या शैक्षणिक वर्षांमध्ये मध्ये स्थायी समितीला डावलून कोणत्या अभ्यास मंडळावर सदस्य तसेच अध्यक्ष यांना नियुक्त्या देण्यात आलेल्या आहेत? [अभ्यासमंडळे विभाग]</td></tr>
<tr><td></td><td>उत्तर</td><td colspan="4">२०२४-२५ व २०२५-२६ या शैक्षणिक वर्षांमध्ये मध्ये स्थायी समितीला डावलून अभ्यासमंडळावर सदस्य तसेच अध्यक्ष यांना कोणत्याही नियुक्त्या दिलेल्या नाहीत.</td></tr>
<tr><td>२२)</td><td>प्रश्न २</td><td colspan="4">अभ्यास मंडळावरील रिक्त पदे भरणे बाबत माननीय राज्यपाल कार्यालयाकडून काय मार्गदर्शन प्राप्त झालेली आहेत? [अभ्यासमंडळे विभाग]</td></tr>
<tr><td></td><td>उत्तर</td><td colspan="4">अभ्यास मंडळावरील रिक्त पदे भरणे बाबत माननीय राज्यपाल कार्यालयाकडून कोणतीही मार्गदर्शन प्राप्त झालेली नाही. तसेच विद्यापीठानेही मार्गदर्शन मागितले नाही.</td></tr>
<tr><td>२३)</td><td>प्रश्न ३</td><td colspan="4">अभ्यास मंडळाने निवड केलेल्या किती अभ्यास मंडळाच्या अध्यक्षांना अद्याप निवडीचे पत्रे देण्यात आलेली नाहीत? [अभ्यासमंडळे विभाग]</td></tr>
<tr><td></td><td>उत्तर</td><td colspan="4">Regular Board चे प्रथम बैठकीत अध्यक्ष निवड केले जातात, त्यानंतर नाही व तसे Regular Board करीता तदनंतर कोणालाही निवड करुन पत्र दिले नाही.</td></tr>
<tr><td></td><td colspan="2">श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे</td><td colspan="3">डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे</td></tr>
<tr><td>२४)</td><td>प्रश्न १</td><td colspan="4">ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२५ च्या परीक्षेतील निकालानंतर किती रिचेकिंगचे व फोटोकॉपी साठीचे अर्ज विद्यापीठाकडे प्राप्त झाले आहेत? [परीक्षा व मूल्यमापन विभाग]</td></tr>
<tr><td></td><td rowspan="3">उत्तर</td><td></td><td>ओएसएम</td><td>नॉन- ओएसएम</td><td>एकूण संख्या</td></tr>
<tr><td></td><td>फोटोकॉपीसाठीचे एकूण प्राप्त अर्जाची संख्या:</td><td>२२३२</td><td>७९४</td><td>३०२६</td></tr>
<tr><td></td><td>रिचेकिंग/पुनर्मूल्यांकनाचे एकूण प्राप्त अर्जाची संख्या:</td><td>१५४५</td><td>३३५</td><td>१८८०</td></tr>
<tr><td>२५)</td><td>प्रश्न २</td><td colspan="4">विद्या परिषदेच्या निर्णयानुसार एनप्लसटू बाधित विद्यार्थ्यांसाठी विशेष परीक्षा केव्हा घेतली जाणार आहे? [अभ्यासमंडळे विभाग]</td></tr>
<tr><td></td><td>उत्तर</td><td colspan="4">N+२ बाधित विद्यार्थ्यांसाठी विशेष परीक्षा घेण्याच्या अनुषंगाने N+२ समितीची बैठक दि.१६/०२/२०२६ रोजी आयोजित करण्यात आलेली आहे. सदर समितीच्या शिफारशीनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.</td></tr>
<tr><td>२६)</td><td>प्रश्न ३</td><td colspan="4">प्रस्तुत विद्यापीठात शैक्षणिक वर्षे २०२५-२०२६ मध्ये स्थायी समितीच्या बैठका का घेण्यात आलेल्या नाहीत? [सभा व निवडणूका विभाग]</td></tr>
<tr><td></td><td>उत्तर</td><td colspan="4">विविध प्राधिकरणावरील पदे रिक्त झाल्यानंतर बैठकीचे नियोजन करण्यात येते.</td></tr>
</table>

<table>
<tr><td></td><td colspan="2">ॲड. उषा नंदकुमार पवार</td><td>डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे</td></tr>
<tr><td>२७)</td><td>प्रश्न १</td><td colspan="2">अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांच्या किती पाल्यांचे परीक्षा शुल्क माफ करुन शुल्क परत देण्यात आले आहे?<br>[परीक्षा व मूल्यमापन विभाग]</td></tr>
<tr><td></td><td>उत्तर</td><td colspan="2">ॲड. उषा नंदकुमार पवार यांनी दि.०३/१०/२०२५ रोजीच्या अधिसभेसमोर “अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांच्या पाल्यांचे परीक्षा शुल्क माफ करावे अशी शिफारस व्यवस्थापन परिषदेस केली होती. सदर शिफारशीच्या अनुषंगाने सदरचा प्रस्ताव दि.०८ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आला असून सदर बैठकीत पुढीलप्रमाणे ठराव पारित झाला आहे.”
<table><tr><td>ठराव क्र.०७</td><td>सोलापूर जिल्ह्यातील अतिवृष्टी व पूरपरिस्थितीमूळे माहे ऑक्टो/नोव्हे-२०२५ च्या विद्यापीठीय परीक्षा यापूर्वीच पूढे ढकलण्यात आलेल्या आहेत. तसेच परीक्षा शुल्क माफ करणेसाठी अतिवृष्टी व पूरपरिस्थितीमूळे बाधित असणाऱ्या विद्यार्थ्यांचे शुल्क संबंधित महाविद्यालयांनी विद्यापीठाकडे परीक्षा अर्जासोबत भरावे व सदर शुल्क शासनाकडून प्राप्त होताच ते महाविद्यलयास परत करण्याबाबतचे परिपत्रक सर्व संबंधित महाविद्यालयांना निर्गमित करावे असे सर्वानुमते ठरले.</td></tr></table>
उक्त ठरावाच्या अनुषंगाने, प्रस्तुत विद्यापीठ परिपत्रक क्र.४० जा.क्र.पुअहोसोविसो /प.व.मू.मं/२०२५/१९९९, दि.१३/१०/२०२५ अन्वये सर्व संलग्नित महाविद्यालये यांना कळविण्यात आले आहे. तसेच व्यवस्थापन परिषदेच्या दि.१४/११/२०२५ रोजीच्या बैठकीत सदरचा प्रस्ताव सादर केला असता पुढीलप्रमाणे ठराव पारित झाला आहे.
<table><tr><td>ठराव क्र.०९ (०६)</td><td>अधिसभा सदस्या ॲड. उषा नंदकुमार पवार यांनी ठराव क्र.१६ नुसार पाठविलेल्या सुचनेच्या अनुषंगाने दि.०३/१०/२०२५ रोजीच्या अधिसभा बैठकीत व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.</td></tr></table>
शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील ऑक्टोबर/नोव्हेंबर या सत्रातील विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्कापोटी एकूण ८,३२,६०,७०४/- (आठ कोटी बत्तीस लाख साठ हजार सातशे चार) इतकी रक्कम विद्यापीठाकडे जमा केली आहे. उक्त ठरावाच्या अनुषंगाने, सदर रक्कमेची प्रतिपूर्ती संबंधित विद्यार्थ्यांना महाविद्यालयामार्फत करणेसाठीचा प्रस्ताव शासनाकडे जा.क्र.पुअहोसोविसो /व्ही.सी/परीक्षा व मूल्यमापन विभाग/२०२५/१३२, दि.०७ नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आला आहे.</td></tr>
<tr><td>२८)</td><td>प्रश्न २</td><td colspan="2">शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ व २०२५-२०२६ मध्ये Judicial Magistrate First Class (JMFC) च्या परीक्षेच्या तयारी संदर्भात विद्यापीठ संलग्नित विधी महाविद्यालयात किती मार्गदर्शन शिबिरे घेण्यात आली?<br>[परीक्षा व मूल्यमापन विभाग]</td></tr>
<tr><td></td><td>उत्तर</td><td colspan="2">सदरचा प्रश्न संदिग्ध स्वरुपाचा आहे.</td></tr>
<tr><td>२९)</td><td>प्रश्न ३</td><td colspan="2">शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ पासून २०२५-२०२६ पर्यंत विद्यापीठ विद्यार्थी तक्रार निवारण समितीच्या किती बैठका घेण्यात आल्या व किती विद्यार्थ्यांच्या तक्रारीचे निराकरण करण्यात आले?<br>[विद्यार्थी विकास विभाग]</td></tr>
<tr><td></td><td>उत्तर</td><td colspan="2">शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ पासून २०२५-२०२६ पर्यंत विद्यार्थी तक्रार निवारण समितीच्या एकूण १४ बैठका घेण्यात आला व एकूण ८ विद्यार्थ्यांच्या तक्रारी प्राप्त झाल्या त्या सर्व तक्रारीचे निराकरण करण्यात आले.</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | डॉ. राजेंद्र शंकर सुर्यवंशी | डॉ. आय. जे. तांबोळी |
| ३०) | प्रश्न १ | प्रस्तुत विद्यापीठात ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२५ विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षा मध्ये किती विषयाच्या अभ्यास मंडळास डावलून परस्पर परीक्षकांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| | उत्तर | **प्रस्तुत विद्यापीठात ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२५ मध्ये झालेल्या प्रात्यक्षिक परीक्षेमध्ये संबंधित विषयाच्या अभ्यास मंडळाकडून नियुक्त परीक्षकांच्या यादीतील परीक्षकांचीच नियुक्ती करण्यात आलेली आहे. पॅनलबाहेरील एकाही परीक्षकांची परस्पर नियुक्ती करण्यात आलेली नाही.** |
| ३१) | प्रश्न २ | कोण कोणत्या महाविद्यालयामध्ये एक स्थानिक चौकशी समिती जाऊन आल्यानंतर दुबार संलग्नता / स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आल्या? [संलग्नता विभाग] |
| | उत्तर | **कोणत्याही महाविद्यालयामध्ये एक स्थानिक चौकशी समिती जाऊन आल्यानंतर दुबार संलग्नता/स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आल्या नाहीत.** |
| ३२) | प्रश्न ३ | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ कलम ११७ नुसार AAA च्या समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत का? [संलग्नता विभाग] |
| | उत्तर | **होय, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११७(२) सक्षम प्राधिकरणांनी नामनिर्देशित केलेल्या सदस्यांचा समावेश करुन AAA च्या समित्या गठीत करण्यात आल्या आहेत.** |
| | डॉ. भगवान नागनाथ आदटराव | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे |
| ३३) | प्रश्न १ | शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये CAS पदोन्नती समितीची प्रक्रिया झाल्यानंतर विद्यापीठाकडे किती CAS पदोन्नतीच्या मान्यता प्रलंबित आहेत व कोणत्या शासन निर्णयानुसार किंवा आदेशानुसार त्या प्रलंबित आहेत? [आस्थापना विभाग/शैक्षणिक, संशोधन आणि विकास] |
| | उत्तर | विद्यापीठ परिसर शैक्षणिक संकुलातील नियमित अध्यापकांच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील कॅस पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे.<br>**शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकांचे कॅस अंतर्गत स्थाननिश्चिती/पदोन्नती समितीची प्रक्रिया झाल्यानंतर विविध विषयांचे स्टेज १ ते ५ च्या विद्यापीठाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावापैकी सद्यस्थितीत एकही प्रस्ताव प्रलंबित नाहीत. तसेच विद्यापीठाकडे संलग्नित महाविद्यालयाकडून शिक्षकांचे कॅस अंतर्गत स्थाननिश्चिती / पदोन्नती समितीची प्रक्रिया झाल्यानंतर एकूण १३ प्राप्त प्रस्तावावर मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.** |
| ३४) | प्रश्न २ | विद्यापीठाच्या सिनेट बैठकीत निर्णय झाला असताना सुध्दा, विद्यापीठात सुरु असलेल्या सर्व न्यायालयीन प्रकरणामध्ये विद्यापीठ पॅनेल बाहेरील नेमण्यात आलेल्या वकिलांच्या नियुक्त्या रद्द करण्यात आलेल्या आहेत का? नसल्यास त्याची कारणे काय आहेत? [कायदा विभाग] |
| | उत्तर | **प्रस्तुत विभागाकडील माहितीनुसार विद्यापीठाच्या सिनेट बैठकीत प्रश्नात नमूद, विद्यापीठात सुरु असलेल्या सर्व न्यायालयीन प्रकरणामध्ये विद्यापीठ पॅनेल बाहेरील नेमण्यात आलेल्या वकीलांच्या नियुक्त्या रद्द करण्यासंदर्भात निर्णय झालेला नाही.** |

| | | |
|---|---|---|
| ३५) | प्रश्न ३ | प्रश्नपत्रिकेतील टायपिंग चुका व प्रश्नप्रत्रिका मधील प्रश्नांबाबतची समानता याबाबत संबंधित अभ्यास मंडळाचा अभिप्राय न घेता शिक्षकांना प्रमाद समिती समोर का बोलावण्यात आले? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| | उत्तर | याबाबत कार्यवाही खालीलप्रमाणे असे.<br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील ४८ (४) प्रावधनानुसार विद्यापीठ, संलग्न, संचालित महाविद्यालये, समुह महाविद्यालये किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्या प्रत्येक अध्यापकावर आणि अध्यापकेतर कर्मचाऱ्यावर, विद्यापीठाच्या परीक्षा व विद्यार्थ्यांचे मूल्यमापन याबाबत परिनियमाद्वारे विहीत केल्याप्रमाणे आवश्यक ते सहाय्य आणि सेवा देणे बंधणकारक असेल. याबाबत विद्यापीठाच्या किंवा महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या आदेशाचे अनुपालन करण्यास कोणत्याही अध्यापकाने किंवा अध्यापकेतर कर्मचाऱ्याने कसूर केल्यास, ती गैरवर्तनुक असल्याचे समजण्यात येईल आणि तो कर्मचारी शिस्तभंगविषयक कारवाईसाठी पात्र असेल. याबाबत विद्यापीठाच्या आदेशाचे अनुपालक करण्यात, कोणत्याही संलग्न महाविद्यालयाच्या, संचालिक महाविद्यालयाच्या, समुह महाविद्यालयाच्या किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या अध्यापकाच्या किंवा अध्यापकेतर कर्मचाऱ्याच्या वतीने कसूर झाल्यास, कुलगुरुस, त्यांच्याविरुध्द, समुचित कारवाई करण्याचा अधिकार असेल, यामध्ये परिनियमाद्वारे विहीत करण्यात आले असेल त्याप्रमाणे, अध्यापकाच्या नियुक्तीच्या मान्यतेस स्थगिती देण्यासह शास्ती लादण्याचा समावेश असू शकेल.<br>४८(५)(क) प्रावधानानुसार विद्यापीठाद्वारे किंवा त्याच्या वतीने परीक्षा किंवा विद्यार्थ्यांचे मूल्यमापन किंवा औपचारिक सराव याबाबत सहाय्य किंवा सेवा देण्यासाठी विद्यापीठाच्या आदेशाचे अनुपालन करण्यात कसूर केल्याबद्दल आणि विद्यार्थी, प्राश्रीक, परिक्षक, नियामक, निर्देशी, अध्यापक यांच्या किंवा परीक्षापूर्व टप्पा आणि परिक्षेनंतरचा टप्पा यासह किंवा अशा कोणत्याही इतर टप्प्यावर परीक्षा घेण्याशी संबंधित इतर कोणत्याही व्यक्तींच्या चुकांबद्दल अन्वेषण करण्यासाठी व त्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यासाठी, परीक्षा व मूल्यमापन मंडळ पाचहून अधिक नसतील अशा व्यक्तींची, ज्यामध्ये एक अध्यक्ष असेल, समिती घटित करील.<br>४८(५) (ख) प्रावधननुसार अशी समिती, कुलगुरुला तिचा अहवाल व शिफारशी सादर करील. कुलगुरु, हा परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक यांना गैरव्यवहारात प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे सहभागी असलेल्या व्यक्तीविरुध्द किंवा व्यक्तींविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याचे निर्देश देईल आणि संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ हा, कुलगुरुच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही करील.<br>वरील प्रावधनानुसार ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२४ सालामध्ये ५६ प्रकरणे खालील कारणामूळे प्रमाद समितीसमोर ठेवण्यात आलेले आहेत.<br>१. मार्च/एप्रिल २०२४ मधील काही प्रश्नपत्रिकेतील प्रश्न ६०% ते १००% पुनरावृत्ती होणे.<br>२. प्रश्नपत्रिका विद्यापीठाने तयार करण्यात आलेल्या Nature of Question Paper नुसार न देणे.<br>३. एकाच प्रश्नपत्रिकेमध्ये दोन किंवा तीनवेळा प्रश्न Repeat करणे.<br>४. सेमिस्टर ३ चा Press Copy मध्ये सेमिस्टर ४ चा पेपर देणे.<br>५. बी. कॉमच्या Press Copy मध्ये बी. ए. चा पेपर देणे.<br>६. Press Copy मधील वरील पेपर कोड चुकणे.<br>वरील कारणामूळे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ४८ मधील तरतूदीच्या अनुषंगाने वरीष्ठांच्या मान्यतेनुसार प्रमाद समिती समोर पाचारण करण्यात आले आहे. |

| | | |
|---|---|---|
| | डॉ. शिरीषकुमार विठ्ठल शिंदे | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील |
| ३६) | प्रश्न १ | प्रस्तुत विद्यापीठातील कोण-कोणत्या विषयाच्या आर.ए.सी. व आर. आर. सी. मध्ये आपल्या विद्यापीठातील शिक्षकांऐवजी बाहेरील विद्यापीठातील शिक्षक नेमण्यात आले आहेत? [संशोधन विभाग] |
| | उत्तर | RAC विषयतज्ञांची यादी सोबत जोडली आहे. तसेच RRC करीता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील नियम क्र.३७(२) (a) (iv) अन्वये एक विषयतज्ञ विद्यापीठ परिक्षेत्राबाहेरील असणे आवश्यक आहे. त्यानुसार ज्या त्या विषयांकरीता बाहेरील विषयतज्ञांचे नामनिर्देशन होवून RRC समित्यांचे गठन झालेले आहे. (सहपत्र १० ते १४) |
| ३७) | प्रश्न २ | प्रस्तुत विद्यापीठातील आर.ए.सी. व आर. आर. सी. या बैठकांमध्ये विद्यापीठाबाहेरील तज्ज्ञांची उपस्थिती किती आहे? [संशोधन विभाग] |
| | उत्तर | सदर प्रश्नाचा अर्थबोध होत नाही. |
| | श्री. अजिंक्य तानाजी देशमुख | डॉ. सुशिल कुमार शिंदे |
| ३८) | प्रश्न १ | विद्यापीठामध्ये एकूण किती क्रीडांगणे आहेत आणि सद्यस्थितीत त्याचा वापर केला जात आहे का? [क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग] |
| | उत्तर | विद्यापीठामध्ये एकूण ०९ क्रीडांगणे आहेत. सद्यस्थितीत त्याचा वापर केला जात आहे. |
| ३९) | प्रश्न २ | विद्यापीठात असलेले कायम कर्मचारी व त्यांचे कार्य नियोजन आराखडा आणि त्यांना देण्यात आलेल्या जबाबदारी व त्यानुसार काम वेळेत होते का? यासंदर्भात वर्क ऑडिट केले गेले आहे का? केले नसेल तर का केले गेले नाही? करण्याचे नियोजन आहे का? [आस्थापना विभाग] |
| | उत्तर | विद्यापीठात असलेले कायम कर्मचारी यांचे कार्य नियोजन आराखडा तयार करण्यात आला नसून वर्क ऑडिट करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली असून कार्यवाही सुरु आहे. |
| | श्री. सुरज ज्ञानोबा मस्के | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे |
| ४०) | प्रश्न १ | "Edulab परीक्षा प्रणाली खरेदी व अंमलबजावणीच्या वेळी परीक्षा प्रक्रियेतील पुनरावृत्ती खर्च (Recurring Expenditure) लक्षणीयरीत्या कमी होईल, असे आश्वासन देण्यात आले होते. त्या अनुषंगाने Edulab पूर्वी व Edulab नंतरचा परीक्षा खर्च यांची तुलनात्मक माहिती सभागृहास सादर करण्यात आली आहे काय?" [परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| | उत्तर | नाही. |
| ४१) | प्रश्न २ | "एकात्मिक विद्यापीठ व्यवस्थापन प्रणाली (IUMS) लागू करताना परीक्षा, विद्यार्थी माहिती व निकाल प्रक्रिया एकत्रित झाल्यामुळे खर्चात बचत होईल, असे स्पष्ट करण्यात आले होते. तथापि, परीक्षा खर्चात घट दिसून न येता वाढ का होत आहे, याबाबत प्रशासनाचे स्पष्टीकरण काय आहे?" [परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| | उत्तर | IUMS पूर्वी ५ स्फॉफ्टवेअर होते. Core, Spashgain, ICTRD, MKCL, Veritoz यामूळे परीक्षेत अनेक अडचणी होत्या, जसे की RR चे अधिक प्रमाण, मार्क्स मधील चूका, नावात चूका, ग्रेडमधील चूका, टोटल चूका, सेमीस्टरवाईज मार्क्स मेमो मध्ये फरक, फोटो नसणे इत्यादी पंरतु IUMS Software मुळे परीक्षा प्रणाली सक्षम झालेली आहे. परीक्षेचा सर्व डेटा आता एकत्र आहे. तसेच सर्व परीक्षा डिजीटल झाल्या आहेत. ॲडमिशन पासून ते डिग्री सर्टिफिकेटपर्यंत सर्व काही डिजीटल झाले आहे. याचा परिणाम निकाल प्रक्रिया गतीमान झालेली आहे. मॅन्युअल इंटरफेरन्स नसल्यामूळे परीक्षा प्रणाली विश्वासार्ह झालेली आहे. |

***